सिन्नर पोलिस ठाणे, नाशिक ग्रामीण

पत्ता :-तहसिल कार्यालय जवळ,ता.सिन्नर,जि.नाशिक -४२२१०३
फोन नं. ०२५५१-२२००३३
Email - sinner.ps@gmail.com

**प्रेस नोट** दि.०६/०३/२०२४

## महिलांच्या गळयातील सोने हिसकवणा-या टोळीचा सिन्नर पोलीसांकडुन पर्दाफाश जबरी चोरी व चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस

सिन्नर तालुक्यात वारंवार होत असलेल्या चैन स्नॅचिंग मुळे सिन्नरकरांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले होते.त्यावरुन मा.पोलीस अधीक्षक श्री.विक्रम देशमाने सो.यांनी सिन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.संभाजी गायकवाड यांना सुचना व मार्गदर्शन करून चैन स्नॅचींगच्या गुन्हयांना प्रतिबंध करून दाखल गुन्हे उघडकीस आणणे बाबत सक्त सुचना दिल्या होत्या.

त्यावरून पोलीस निरीक्षक श्री.संभाजी गायकवाड यांनी मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी निफाड विभाग श्री.डॉ.निलेश पालवे यांच्याकडुन सुचना व मार्गदर्शन प्राप्त करून ताबे पोलीसांचे एक पथक निर्माण करून अशा गुन्हयांचा व गुन्हेगारांच्या एमओबीचा अभ्यास करून त्यांना जेरबंद करण्याच्या सुचना दिल्या.

त्यानुसार पथकाने नाशिक जिल्हयातील व अहमदनगर जिल्हयातील गोपनीय बातमीदारांचे जाळे निर्माण करून वारंवार त्यांच्या संपर्कात राहुन गोपनीय माहीती प्राप्त केली.त्यावरून सदरचे गुन्हे हे नाशिकरोड भागातील गोसावी वाडी येथील छग्या उर्फ ओंमकार रमेश काळे वय-१९ यांने त्यांचे साथीदांराचे मदतीने केल्याची माहिती प्राप्त झाली.पोलीस पथक सतत त्याच्या मागावर असताना तो वारंवार पोलीसांना चकवा देवुन पळुन जात असे तरी देखील पोलीसांनी सतत पाठलाग करून त्या ताब्यात घेवुन त्याच्याकडे विचारपुस केली असता त्याने सिन्नर तालुक्यात चैन स्नॅचिंगचे ०३ गुन्हे वडाळा महादेव ता.श्रीरामपुर जि.अहमदनगर येथील एका इसमाचे मदतीने केल्याची कबुली दिली.त्यावरून त्याचा शोध घेत असताना तो विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न झाले . त्यास त्याचे पालकांसमक्ष ताब्यात घेवुन विचारपुस करता त्याने यातील आरोपी छग्या काळे याचे सोबत चैन स्नॅचिंगचे ०३ गुन्हे व अन्य साथीदार नामे मोहित पुर्ण नाव पत्ता माहीत नाही याचे सोबत ०१ बॅग लिफटींगचा गुन्हा केल्याचे कबुली दिली आहे.तसेच त्यांनी श्रीरामपुर जि.अहमदनगर येथे देखिल अशा प्रकारचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.आरोपीताचे सांगणे प्रमाणे अभिलेख पाहणी केली असता त्यांनी १) सिन्नर पोलीस स्टेशन गुरनं ६०/२०२४ भादविक ३९२,२)सिन्नर पोलीस स्टेशन गुरनं ७७/२०२४ भादविक ३९२,३) सिन्नर पोलीस स्टेशन । गुरनं ४७५/२०२३ भादवीक ३७९ व ४) वावी पोलीस स्टेशन । गुरनं ४५५/२०२३ भादविक ३९२,३४ असे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असुन त्यांचेकडुन **९९,२००/-** रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने व **२५,०००/-**रूपये रोख असा एकुण **१,२४,२००/-** रू.किचा मुददेमाल हस्तगत केला असुन त्यांच्याकडुन अन्य अपराध देखील उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक श्री.विक्रम देशमाने सो.,मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी निफाड विभाग श्री.डॉ.निलेश पालवे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सिन्नर पोलीस स्टेशनचे **पोलीस निरीक्षक,श्री संभाजी गायकवाड,यांचे मार्गदर्शनाखाली पो उप निरी श्री हनुमान उगले,पोउप निरी श्री.आजिनाथ कोठाळे, पोहवा/नवनाथ पवार, पोना/समाधान बोराडे,पोना/हेमंत तांबडे,पोशि/ कृष्णा कोकाटे,पोशि/ आप्पासाहेब काकड तसेच तांत्रीक विश्लेषण शाखा, नाशिक ग्रामीणचे पोना/प्रदिप बहीरम ,पोना/हेमंत गिलबिले** यांनी केली आहे.